पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८.
मा. शहर सुधारणा समिति
**कार्यपत्रिका क्रमांक - ११**
**सभावृत्तात**

दिनांक :- ०३ / १० / २०१२ वेळ :- दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०३ / १० / २०१२ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. बो-हाडे शुभांगी संजय- सभापती
२) मा. काळजे नितीन प्रताप
३) मा. यमुनाताई रमणनाना पवार
४) मा. बहिरवाडे नारायण सदाशिव
५) मा. लोंढे गणेश नारायण
६) मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
७) मा. सावळे सिमा रविंद्र

याशिवाय मा.गावडे - सहा.आयुक्त, मा. चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.पाटील, मा.तांबे, मा.ढगे - कार्यकारी अभियंता, मा.शिंपी - नगररचनाकार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा. सदस्यांच्या संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले -**

विषय क्र.२ :- कलम २०५ अन्वये पिंपळे निलख येथील विशालनगर भागामध्ये ( कोबल कॉलनी ) रस्ता प्रस्तावित करणेबाबत - मा.शुभांगी बो-हाडे, मा.नारायण बहिरवाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३ :- ३७ अन्वये पिंपळे निलख येथील डी.पी.रस्ता सरळ करणेबाबत - मा.शुभांगी बो-हाडे, मा.नारायण बहिरवाडे यांचा प्रस्ताव.

----------

**दिनांक २०/०९/२०१२ व २४/०९/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १० ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

**----------**

**खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक :- मा.सिमा सावळे अनुमोदक :- मा. सुरेश म्हेत्रे

शुक्रवार दिनांक ०५/१०/२०१२ दुपारी १२.०० पर्यंत सभा तहकूब करणेत यावी.
सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**मा.सभापती -** शुक्रवार दिनांक ०३/१०/२०१२ दुपारी १२.०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( बो-हाडे शुभांगी संजय )**
सभापती
शहर सुधारणा समिति
पिंपरी चिंचवड मनपा, पिंपरी १८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८.
मा. शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - ११**
**सभावृत्तात**
( दिनांक ०३/१०/२०१२ ची तहकूब सभा )

दिनांक :- ०५ / १० / २०१२ वेळ :- दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची दिनांक ०३/१०/२०१२ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक ०५ / १० / २०१२ रोजी दुपारी १२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. बो-हाडे शुभांगी संजय - सभापती
२) मा. काळजे नितीन प्रताप
३) मा. यमुनाताई रमणनाना पवार
४) मा. बहिरवाडे नारायण सदाशिव

याशिवाय मा.गावडे - सहा.आयुक्त, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.काची - सह शहर अभियंता, मा.तांबे, मा.ढगे, मा.कुलकर्णी - कार्यकारी अभियंता, मा.शिंपी - नगररचनाकार, मा.डॉ.गोरे - पशुवैद्यकीय अधिकारी हे अधिकारी उपस्थित होते.

----------

ठराव क्रमांक :- ५९ विषय क्रमांक : १
दिनांक :- ०५/१०/२०१२ विभाग :- नगररचना व विकास
सुचक :- मा. नारायण बहिरवाडे अनुमोदक :- मा. नितीन काळजे
संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/४क/३९०/१२ दि. १५/०९/२०१२

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मौजे मोशी येथील आरक्षण क्र.१/१६८ स्मशानभुमी विस्तार व आरक्षण क्र.१/१६९ प्राणी दहनभूमी या प्रस्तावाने बाधित होणा-या खाजगी मिळकतींचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (२) व भूसंपादन अधिनियम १८९४ चे तरतुदीनुसार भूसंपादन करावे लागेल. या भूसंपादनास व याकामी येणा-या खर्चास ( संबंधित भूमिसंपादन अधिकारी कळवतील ती नुकसान भरपाईची रक्कम ) मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले -**

ठराव क्रमांक :- ६० विषय क्रमांक : २
दिनांक :- ०५/१०/२०१२
सुचक :- मा. शुभांगी बो-हाडे अनुमोदक :- मा. नारायण बहिरवाडे
संदर्भ :- मा.शुभांगी बो-हाडे, मा.नारायण बहिरवाडे यांचा प्रस्ताव -

विशालनगर पिंपळे निलख प्रभाग क्र.५४ मध्ये विशालनगर पिंपळे निलख असा ८० फुट डी. पी. रस्ता आहे. सदर रस्त्याला लागून श्री कोबल यांची कॉलनी आहे. त्या कॉलनीमध्ये जाताना ९० फुट वाकडा रस्ता जात आहे. तरी सदर रस्ता २०५ अन्वये सरळ करुन कार्यवाही करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ६१ विषय क्रमांक : ३
दिनांक :- ०५/१०/२०१२
सुचक :- मा. शुभांगी बो-हाडे अनुमोदक :- मा. नारायण बहिरवाडे
संदर्भ :- मा.शुभांगी बो-हाडे, मा.नारायण बहिरवाडे यांचा प्रस्ताव -

पिंपळे निलख ते बाणेर असा ६० फुट डी. पी. मधील रस्ता मुळा नदीला लागून दक्षिण उत्तर आहे. सदर रस्ता डी. पी. मध्ये थोडा वाकडा प्रस्तावित केला आहे. त्यामुळे गोरगरीबांची १८ घरे बाधीत होत आहेत. सदर रस्ता सरळ केल्यास १८ नागरिकांची घरे वाचणार आहेत व रस्ता सुध्दा सरळ होणार असल्याने ३७ अन्वये कार्यवाही करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**( बो-हाडे शुभांगी संजय )**
सभापती
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड मनपा, पिंपरी १८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस / ४ / कावि / १२४७ / २०१२
दिनांक :- ०५ / १० / २०१२

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत :- सर्व संबंधीत शाखा प्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.